सत्यमेव जयते

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,

# ( महाराष्ट्र ) मुंबई

सामान्य परिचर्या व प्रसविका अभ्यासक्रम (३ वर्ष)

(महिला व पुरुष उमेदवारांकरिता)

## प्रवेश नियमावली : २०२४ – २०२५

# प्रास्ताविक :

१) सामान्य :- हे नियम महाराष्ट्र राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणाऱ्या सर्व नर्सिंग संस्थांमधील तीन वर्ष कालावधीच्या “सामान्य परिचर्या व प्रसाविका” (जीएनएम) प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

२) व्याख्या :-

- राज्य शासन म्हणजे महाराष्ट्र राज्य शासन होय.
- वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत ग्रामीण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, विविध स्तरावर विविध योजना राबविण्यासाठी काम करणारे संचालनालय होय.
- संचालक, संचालक म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन सुचालनालयाचे प्रमुख होय.
- सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन अंतर्गत शुश्रुषा विभागाचे प्रमुख होय.
- अधिक्षिका, शुश्रुषा सेवा म्हणजे संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन अंतर्गत शुश्रुषा विभागाच्या प्रमुखास सहाय्य करणारे होय.
- प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority) म्हणजे राज्य स्तरावर संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती आणि राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथिल अधिष्ठाता/अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेली समिती होय.
- उमेदवार म्हणजे बारावी (१०+२) उत्तीर्ण आणि या अभ्यासक्रम प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी होय.
- महाराष्ट्र परिचर्या परिषद म्हणजे उत्तीर्ण उमेदवारांची नोंदणी करणारी शासनाच्या अधिनस्त स्वायत्त संस्था होय.
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ परिचर्या प्रसविका अभ्यासक्रम राबविणे, परिक्षा घेणे, इत्यादीसाठी शासनाच्या अधिनस्त स्वायत्त संस्था होय.

३) प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी ( Competent Authority ) :–

१) राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रियेचे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे सक्षम प्राधिकारी राहतील. सक्षम प्राधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत संस्थानिहाय निवड समितीने केलेल्या प्रवेश प्रक्रियेची तपासणी करतील व प्रवेश प्रक्रियेस अंतिम मान्यता देतील. यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे.

| | |
|---|---|
| सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | – अध्यक्ष |
| अधिक्षिका, शुश्रुषा सेवा, वै.शि.व संशोधन, मुंबई | – सदस्य सचिव |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी, वै.शि.व संशोधन, मुंबई | – सदस्य |
| प्रशासकीय अधिकारी (नर्सिंग) वै.शि.व संशोधन, मुंबई | – सदस्य |

- प्रवेश प्रक्रियेबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सक्षम प्राधिकारी (आयुक्त, वै.शि.) निर्णय घेतील व त्यांचा निर्णय अंतिम असून सर्व उमदेवारांना बंधनकारक राहतील.

## २) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील जीएनएम प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती :-

सदरील प्रवेश प्रक्रिया राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये येथील जीएनएम अभ्यासक्रमासाठी राबविली जात असल्याने संबंधित रुग्णालयाचे अधिष्ठाता/अधिक्षक हे निवड समितीचे प्राधिकारी राहतील. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील जी.एन.एम अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे समिती नियुक्ती केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अधिष्ठाता / वैद्यकीय अधिक्षक | - अध्यक्ष |
| २) | वैद्यकीय अधिक्षक | - सदस्य |
| ३) | प्राध्यापक व विभागप्रमुख (अधिष्ठाता नामनिर्देशित) | - सदस्य |
| ४) | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - सदस्य |
| ५) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| ६) | अधिसेविका (संबंधित रुग्णालय) | - सदस्य |
| ७) | मुख्य प्रशासकीय अधिकारी/प्रशासकीय अधिकारी (संबंधित रुग्णालय) | - सदस्य |
| ८) | प्राचार्य परिचर्या प्रशिक्षण संस्था (संबंधित रुग्णालय) | - सदस्य सचिव |

- या समितीचे सदस्यसचिव शासनाच्या मागदर्शक सूचनांनुसार अध्यक्षांच्या मागदर्शनाखाली उमेदवारांकडून प्रवेश अर्ज मागविणे, अर्जाची छाननी करणे, सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करणे व प्रसिध्द करणे, पात्र उमदेवारांना मुलाखतीसाठी बोलाविणे, मुलाखत प्रक्रिया राबविणे, निवडलेल्या उमदेवारांना निवडपत्र पाठविणे इत्यादी कामे करतात.
- मुलाखत प्रक्रिया सर्व समिती सदस्यांमार्फत राबविली जाते.
- सर्वसाधारण गुणवत्ता यादीवर तसेच मुलाखत यादीवर अधिष्ठाता, अधिसेविका व प्राचार्य यांची सही असावी.
- निवडयादी व प्रतिक्षा यादीवर निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या सहया असाव्यात.

## ३) जागावाटप :-

- वैद्यकीय शिक्षण औषधीद्रव्ये विभागांतर्गत राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जी.एन.एम. प्रशिक्षण संस्था कार्यान्वित नसल्याने सध्या कार्यरत संस्थांमधील जी.एन.एम.अभ्यासक्रमाची विद्यार्थी क्षमता माहितीपुस्तिकेत दर्शविण्यात आलेली आहे.
- ज्या महसूल विभागात महाविद्यालय कार्यरत आहे, त्या महसूल विभागातील स्त्री/पुरुष उमेदवारांनी प्रवेशासाठी महसूल निहाय नेमून दिलेल्या कोटयाचा फायदा घेण्यासाठी महसूल विभागातील जिल्हयाचा रहिवाशी असल्याचा (जिल्हाधिकारी/तहसील (सेतू) कार्यालयाचा) दाखला सादर करावा.
- परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय, गो.ते.रुग्णालय व सेन्ट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथे प्रशिक्षणासाठी कोकण महसूल विभागाचा कोटा देण्यात आलेला आहे.

४) खालील महाविद्यालयातील संलग्न असलेला महसूल विभाग खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | महसूल विभाग | संस्था | जिल्हे |
|---|---|---|---|
| १. | कोकण विभाग (मुंबईसह) | १) सेन्ट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई (२० जागा)<br>२) गो.ते.रुग्णालय, मुंबई (२५ जागा) | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग |
| २. | नाशिक | सर्वोपचार रुग्णालय, धुळे (२० जागा) | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर |
| ३. | पुणे | १) छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर<br>२) पं.व.पा.शा.रुग्णालय, सांगली<br>३) छ.प्र.रा.स.रु.कोल्हापूर (प्रत्येकी २० जागा) | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर |
| ४. | छत्रपती संभाजी नगर | १) स्वा.रा.ती.ग्रा.वै.म.व रुग्णालय, अंबाजोगाई<br>२) शा.वै.म.व सर्वो.रुग्णा.लातूर (प्रत्येकी २० जागा) | संभाजी नगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद व लातूर |
| ५. | अमरावती | शा.वै.म व रुग्णालय, अकोला (२० जागा) | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम व यवतमाळ |
| ६. | नागपूर | इंदिरा गांधी शावैमव रुग्णालय, नागपूर (२७ जागा) | वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली |

# महाराष्ट्र शासन

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण,संशोधन व आयुष महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत चालविण्यात येत असलेल्या परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातील सामान्य परिचर्या व प्रसविका (जीएनएम) अभ्यासक्रम ३ वर्ष (महिला व पुरुष उमेदवारांकरीता)

## प्रवेश नियम २०२४ - २०२५

**अ)** उपरोक्त अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्णरित्या भरुन ते संबंधित संस्थाप्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज संबंधित परिचर्या महाविद्यालय ज्या रुग्णालयाशी संलग्न असेल तेथील अधिसेविका कार्यालयातून कार्यालयीन वेळेत **सका. १० ते सायं.५.००** या वेळेत मिळतील. उमेदवाराने परिपूर्णरित्या भरलेला अर्ज संबंधित संस्थेकडून निश्चित करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत जमा करणे अनिवार्य आहे. विहित तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**आ)** बृहन्मुंबईतील शासकीय रुग्णालयाशी संलग्नित असलेल्या परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातील ५० टक्के जागा ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हयातील उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत. या जागा अशा उमदेवारांकडून भरल्या गेल्या नाहीत तर त्या बृहन्मुंबईतील उमदेवारांमधून भरण्यात येतील.

**इ)** वयोमर्यादा :- प्रवेश वर्षी **३१ डिसेंबर २०२४** रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षांपेक्षा कमी व ३५ वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये.

## शैक्षणिक अर्हता :-

अ) उमेदवार महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यनिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (१०+ २) अथवा समतुल्य परीक्षा शासन मान्य संस्थेतून प्राधान्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या शास्त्र व इंग्रजी विषयांसह कमीतकमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**ब)** वरील प्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध झाले नाहीत तर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची कोणत्याही शाखेतील आणि कोणत्याही विषयातील उच्च माध्यमिक परीक्षा (१०+ २) कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल. प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

क) या अभ्याक्रमासाठी उपलब्ध असलेल्या जागांतून सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (Auxilliary Nurse Midwifery) वा बहुउद्देशिय आरोग्य कार्यकर्ता (Multipurpose Health Worker) अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांसाठी ५ टक्के जागा राखीव असतील. मात्र असे उमेदवार १२वी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे व या अभ्याक्रमाबाबतच्या अन्य अटींची पुर्तता करीत असावेत. कोठेही सेवेत असलेल्या तसेच संबंधित संस्थेतून या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीने येणाऱ्या सदर जागांवरील उमदेवारांना या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीने येणाऱ्या सदर जागांवरील उमदेवारांना कोणतेही विद्यावेतन अनुज्ञेय असणार नाही. तथापि जे उमेदवार कोठेही नोकरीला नसतील त्यांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील. मात्र त्यासाठी त्यांना विहित केलेल्या प्रपत्रात तसेच प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१ द्यावे लागेल. या जागांकरीता जर उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर जागा उर्वरीत जागात मिळविण्यात येतील.

५) संचालनालयाचे पत्र क्र.संवैशिवसं/एनयुआर/जीएनएम/मापु/मान्यता/३/ई/२०१६ दि.३०.०८.२०१६ च्या पत्रान्वये, सादर केलेल्या प्रस्तावास शासन पत्र क्र.एनयुआर २०१६/प्र.क्र.१७३/१६/शिक्षण-१, दि.७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये शासन मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमासाठी पुरुष उमेदवारांचे प्रमाणे एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त **३० टक्के** राखीव ठेवण्यात आले आहे. ज्या पुरुष उमदेवारांची शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये जीएनएम अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात येईल त्यांना राहण्याची व मेसची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

६) संपूर्ण महाराष्ट्रातील उपरोक्त महाविद्यालये/रुग्णालयातील पुरुष उमेदवारांच्या वरील राखीव जागांसाठी (३० टक्के प्रमाणे) संबंधित महाविद्यालय/रुग्णालयाची अधिष्ठाता त्यांच्याशी संबंधित महसूल विभागातील पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागवतील आणि त्या अर्जांची छाननी करुन गुणवत्ता यादीनुसार त्यांच्या रुग्णालयातील पुरुष उमेदवारांकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या जागांप्रमाणे पुरुष उमदेवाराची निवड करतील. सदर जागा भरताना नियम क्र.१२ मध्ये उल्लेखिलेल्या राखीव जागांचे पालन करतील.

७) कोणताही अर्ज खालीलप्रमाणे कागदपत्रे (Self Attested) जोडलेली नसतील तर विचारात घेतला जाणार नाही.

अ) शाळा सोडल्याचा दाखला.
ब) १० वी १२ वी (१०+२) परीक्षांच्या गुणपत्रिका व १० वी उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र.
क) अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो.
ख) अर्हताकारी परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण करण्यात आली त्याबाबत शाळा किंवा महाविद्यालयाचे प्रमाणपत्र.
ग) अधिवास (डोसिसाईल) व नागरीकत्व (नॅशनॅलिटी) दाखल्याच्या साक्षांकित प्रती.
घ) जात प्रमाणपत्र.
ङ) जात वैधता प्रमाणपत्र प्रवेशाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
च) किमान नोंदणीकृत वैद्यक व्यावसायिकाचे वैद्यकीय सक्षमता प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate)
छ) आधारकार्डची छायांकित प्रत.

## ९. विशेष सूचना :-

१) उमदेवाराने अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती सादर कराव्यात. मूळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या (मुलाखतीचे) वेळी पडताळणी करीता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. आवश्यक पडताळणीनंतर मूळ प्रमाणपत्रे उमदेवारास परत करण्यात येतील. मूळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी वा पडताळणीच्या वेळी कोणतीही त्रुटी, चुकीची माहिती वा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळून आल्यास संबंधित उमदेवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधीच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल.

२) प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडण्यात यावीत. मूळ प्रवेश अर्जात केलेल्या दाव्याव्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.

३) प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविण्यात आलेला उमेदवार शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. याकरीता ज्या संस्थेत उमेदवाराने अर्ज केला आहे त्या संस्थेत त्याची वैद्यकीय तपासणी केल्यानंतरच उमदेवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल.

४) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रत्येक परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयाकडून संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडे गुणवत्तायादी व निवड झालेल्या उमेदवारांची यादी सादर करण्यात येईल.

५) महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचे परिपत्रक क्र.एमएनसी/जी/सीआयआर/४१७/१११७४/२०१७, दि.०८.६.२०१७ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षासाठी गुणवत्तेनुसार प्रवेशित झालेल्या उमेदवाराचे जी.एन.एम. प्रशिक्षण दि.१ ऑगस्ट, २०२४ पासून सुरु करण्यात येईल. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी त्यात काही बदल केल्यास बदलानुसार त्या दिनांकापासून जी.एन.एम प्रशिक्षण सुरु करण्यात येईल.

६) सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता फक्त भारतीय राष्ट्रीयत्व धारण करणारे उमेदवार पात्र असतील. कालांतराने जर का एखाद्या उमेदवाराने भारतीय राष्ट्रीयत्व धारण केलेले नाही असे आढळून आले तर त्याचा प्रवेश कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय रद्द करण्यात येईल व तो दंडात्मक कायदेशीर कारवाईस पात्र असेल.

## १०. गुणवत्ता :-

प्राप्त झालेल्या अर्जातून उमेदवारांची निवड अर्हता परीक्षेत मिळविलेल्या एकूण गुणांवर आधारीत गुणवत्तेनुसार काटेकोरपणे केली जाईल.

**टीप** :- भूदल, नौदल व वायुदल सेवेत असलेल्या पूर्ण सेवेनंतर सेवानिवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना मृत्यू पावलेल्या, त्याचप्रमाणे परमवीर चक्र,वीरचक्र, महावीर चक्र इत्यादी संरक्षण दलातील मानचिन्ह विजेते तसेच देशाच्या सीमाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी अग्निशमन दलाचे पदक वा शौर्य पुरस्कार आदीनी सन्मानित झालेल्या व्यक्तीचे पदनाम विचारात **न** घेता त्यांच्या पाल्यांना अन्य सर्व बाबीत समरुप राखून निवडीत प्राधान्य राहील. परंतु, त्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्याकडून मिळालेले आवश्यक ते प्रमाणपत्र त्यांना सादर करावे लागेल.

## ११. समबंध

**उमेदवाराचे समान गूण झाल्यास त्यामधून उमदेवारांची गुणानुक्रमे निवड ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात येईल :-**

(१) प्रथम प्राधान्य ज्या उमेदवाराचे १२ वी (१०+२) परीक्षेतील पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचे एकत्रित गूण जास्त असतील त्यास राहील.

(२) द्वितीय प्राधान्य ज्या उमदेवाराचे १२ वी (१०+२) परीक्षेतील पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र व जीवशास्त्र व इंग्रजी या विषयांचे एकत्रित गूण जास्त असतील त्यास राहील.

(३) तृतीय प्राधान्य ज्या उमेदवाराचे १० वी सर्व विषयांचे एकूण गूण जास्त असतील त्यास राहील.

(४) वरील तिन्ही ठिकाणी साम्य असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त असेल त्याला संधी दिली जाईल.

वरील सर्व अटी राखीव जागांवरील उमेदवारांच्या निवडीसही लागू राहतील.

## १२. मागासवर्गीय उमदेवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण :-

### तक्ता - ३

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | अनुसुचित जाती, (अ.जा) | १३ % |
| २. | अनुसुचित जमाती, (अ.ज.) | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ), (विजा.अ) | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब), (भ.ज.ब) | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क), (भ.ज.क) | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड), (भ.ज.ड) | २ % |
| ७. | इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग (इ.मा.व) (वि.मा.प्र) | १९ % |
| ८. | आर्थिकदृष्टया मागासवर्ग (ई.डब्ल्यु.एस.) | १० % |
| ९. | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एस.ई.बी.सी.) | १० % |
| | **एकूण** | **७० %** |

**प्रगत वर्ग :- (Creamy Layer)**

वरील प्रवर्गापैकी (३) ते (७) या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात मोडणाऱ्या उमदेवारांना आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. तथापि, या प्रवर्गातील उमदेवार (शासन निर्णय दि.१६ डिसेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार) जे प्रगत व उन्नत गटात मोडत नाहीत अशा उमदेवारांनी शासन निणर्य सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३० जून, २००६ शी संलग्न असलेल्या प्रमाणपत्राच्या सुधारीत नमुन्यात जे प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. मुदतबाहय प्रमाणपत्र सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

जर मागासवर्गीयांच्या कोणत्याही प्रवर्गातील राखीव जागा रिक्त राहिल्यास त्या उर्वरीत मागासवर्गीय प्रवर्गातील उमदेवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. किंबहुना त्यानंतरही जागा शिल्लक राहिल्यास त्या खुल्या वर्गातील उमदेवारांमधून भरण्यात येतील.

खुल्यावर्गातील उमेदवारांचे गुणवत्तेनुसार प्रवेश प्रथम करण्यात येतील. मागासवर्गीय गटातील उमदेवारास जर त्याच्या गुणवत्तेनुसार या खुल्यावर्गातून प्रवेश मिळाला असेल तर त्यास खुल्या किंवा मागासवर्गातून प्रवेश घेण्याबाबतचा पर्यार देण्यात यईल. जरी त्याने राखीव गटातून प्रवेशासाठी अर्ज सादर केला असेल व तो गुणवत्तेनुसार खुल्या गटातील प्रवेशास पात्र ठरल्यास त्याचा प्रवेश खुल्या वर्गातून झाला असे समजण्यात यईल.

**सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग :- (एस.ई.बी.सी.)**

जी.एन.एम.अभ्यासक्रम संस्थांमधील/महाविद्यालयांतील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताच्या "महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४" मधील तरतुदीनुसार राज्यस्तरीय कोटयाकरीता एकूण उपलब्ध जागांपैकी १० टक्के जागा सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत. सदर आरक्षण हे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर मधील भविष्यातील निर्णयास अधीन राहील.

दिव्यांगासाठी राखीव जागा :

अ) भारतीय परिचर्या परिषदेच्या सूचना क्रमांक दिव्यांग १.५/२०१८-आयएनसी दिनांक १०/०४/२०१९ . दिव्यांग अधिनियम २०१६ अनूसार शारीरिक दृष्टया दिव्यांग व्यंक्तीसाठी ५ टक्के आरक्षण राहील. या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील. याबाबत भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी सुधारित ३ वर्षाच्या जी.एन.एम. अभ्यासक्रमाबाबत दिलेली मार्गदर्शक तत्वे,सूचना हया भारतील परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांच्या वेबसाईट वरुन ( **www.indiannursingcouncil.org)** डाऊनलोड करुन घ्याव्यात व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच अपंगांसाठी राखीव असलेल्या जागांबाबत जी.एन.एम. विद्यार्थ्यांना प्रवेशित करण्यापूर्वी मार्गदर्शक तत्वातरील पृष्ठ क्रमांक २४ अनु.क्र.२ (अ,ब,क) यांचे तंतोतंत पालन करावे.

ब) अपंगासाठी राखीव असलेल्या जागांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने त्याच्या अपंगत्वाबददल जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय मंडळे/शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक अथवा संचालक ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडीसीन ॲन्ड रिहॅबिलीटेशन, हाजी अली, मुंबई, यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत जोडावी.

क) महिला व बालविकास विभाग दिनांक २३.०८.२०२१ अनाथाकीरता १ टक्के आरक्षण लागू राहील. या जागांवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ड) उमेदवाराच्या अपंगात्वाची पडताळणी, याकरीता सक्षम प्राधिकरी यांनी स्थापन केलेल्या वैद्यकीय मंडळामार्फत करण्यात येईल. अशा पडताळणीसाठी विशेष वैद्यकीय मंडळापुढे उपस्थित राहण्याचा दिनांक स्थळ उमेदवारास संबंधित संस्थेमार्फत कळविण्यात येईल.

## १३. सर्वसाधारण :-

परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात शिकत असलेला विद्यार्थी जर शासकीय नियम व कायद्याविरुध्द असलेल्या एखादया राष्ट्रविघातक कार्याशी संबंधित असल्याचे आढळून आले तर कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या प्रशिक्षण महाविद्यालयातून संस्थाप्रमुख काढून टाकू शकतील.

## १४. प्रतिज्ञापत्र :-

परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमदेवारांना पुढील स्वरुपाचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. "सदरहू अभ्यासक्रमास मला प्रवेश देण्यात आल्यास मी असे कबूल करतो/करते की,

१) शासनाने या परिचर्या महाविद्यालयातील नियंत्रणासाठी केलेले व वेळोवेळी करण्यात येणारे सर्व नियम व अटी मला मान्य असून, त्यांचे पालन करणे माझ्यावर बंधनकारक राहील.

२) शासनाने राष्ट्रहितार्थ केलेले कोणतेही नियम, विधी व कायदे यांचे मी योग्यरित्या पालन करीन.

३) जोपर्यंत मी परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थी असेन तोपर्यंत माझ्याकडून महाविद्यालयात/रुग्णालयात किंवा त्याबाहेर नियमबाहय वर्तन होणार नाही. तसे झाल्यास मी विद्यमान वा तात्कालीन शासकीय नियम विधी व कायद्यानुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असेन, आणि...

४) वर कबूल केल्यानुसार वर्तन आचरण्यात उल्लंघन झाल्यास संस्थाप्रमुख मला परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातून कोणहीही पूर्वसूचना **न** देता काढून टाकू शकतील याची मला पूर्ण जाणीव आहे.

५) भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली यांनी घोषित केलेल्या ( Cut off ) दिनांकानंतर प्रशिक्षण सोडून गेल्यास मी **रुपये २५,०००/-** (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) दंड शासनाच्या तिजारीत भरण्यास तयार आहे. त्याशिवाय मला माझी मूळ प्रमाणपत्रे परत करण्यात येणार नाहीत, याची मला जाणीव आहे."

१५. इतर :-

**अ)** नियम १२ मध्ये निर्देशिलेल्या प्रवर्गातील आरक्षित जागांकरीता जे उमेदवार प्रवेश अर्ज सादर करतील त्यांना ते प्रत्यक्षात नमुद केलेल्या जाती व समुहात मोडत असतील तरच त्यासाठीच आरक्षणास पात्र धरण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**ब)** परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश मिळालेल्या उमदेवारांना शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एनयुआर-३९६१/३९५२८/जी, दि.७ जूलै, १९६२ मधील संबंधित परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी परिचारिकांसाठी विहित केलेल्या अटींचे पालन करावे लागेल.

क) जी.एन.एम.परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालये ही महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्न आहेत. त्यातून राबविण्यात येणारे अभ्यासक्रम हे महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळानी निश्चित केलेल्या विषय व प्रात्यक्षिकांनुसार असतात. सदर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरची परीक्षादेखील याच मंडळाकडून घेण्यात येईल व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आवश्यक पदविका महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाकडून बहाल करण्यात येईल.

ड) उमेदवाराची एका संस्थेत निवड झाल्यानंतर त्याच्या संबधित संस्थेतून दुसऱ्या संस्थेत स्थानांतराच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

# “प्रतिज्ञापत्र”

मी सही करणार श्रीमती/श्री ...................................................... असे निवेदन करते/करतो की,

मी सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (Auxilliary Nurse Midwifery) / बहुउद्देशीय आरोग्य कार्यकर्ता (Multipurpose health worker) अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. सध्या मी कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेत नोकरीत नाही. मी सामान्य परिचर्या व प्रसुतीशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना ही माहिती खोटी आढळून आल्यास माझ्यावर शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व मला या प्रशिक्षणातून कोणतीही पूर्वसूचना **न** देता काढून टाकण्यात येईल.

आपला /आपली विश्वासू,

सही ......................................

नाव ........................................

दिनांक :-...........................

ठिकाण :- ..........................

# महाराष्ट्र शासन

## सामान्य परिचर्या प्रसविका अभ्यासक्रम (३) वर्ष

## महिला व पुरुष उमेदवारांकरीता

## प्रवेश अर्ज

## सन २०२४ - २०२५

---

प्रवेश अर्ज दिनांक ---————

अर्ज मूल्य : रुपये २०० /- (खुल्या वर्गासाठी)

अर्ज मूल्य : रुपये १०० /- (मागासवर्गीयांसाठी)

---

| पासपोर्ट आकाराचा अलिकडील फोटो चिटकवावा. |
|---|

---

विशेष सूचना :-

अ) अर्ज योग्यरित्या स्व:हस्ताक्षरात भरण्यात यावा व सोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती साक्षांकित केलेल्या असाव्यात.

ब) अर्जात खाडाखोड करण्यात येवू नये.

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव (विवाहापूर्वीचे) :-

_______________________________________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे नाव)

२) अर्जदाराचे संपूण नाव (विवाहानंतरचे) :- (लागू असल्यास लिहावे)

______________________________________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे नाव)

३) राष्ट्रीयत्व :- ____________

४) आपण महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय ? होय / नाही

असल्यास किती वर्षा पासून... ____________

५) जन्मतारीख :- ____________

६) स्थानिक पत्ता व दुरध्वनी/मो. क्रमांक :- ____________

____________

____________

____________

७) कायमचा पत्ता व दुरध्वनी/मो क्रमांक :- ____________

____________

____________

८) धर्म, जात व जात प्रवर्ग :- ____________

९) आपण मागासवर्गीय आहात काय ? होय / नाही.

असल्यास जात व जात प्रवर्ग

(अ.जा/अ.ज/वि.जा/भ.ज./इमाव-विमाप्र

कृपया नियम १० पहा)

१०) (अ) आपण विवाहित आहात काय ? होय / नाही.

असल्यास पतीचे नाव ____________

नसल्यास वडिलांचे नाव ____________

(ब) वडिल/पालक/पती यांचा व्यवसाय :- ____________

११) एस.एस.सी. (१०वी) ची तत्सम परीक्षा उत्तीर्ण ____________

(अ) परीक्षा मंडळाचे नाव ____________

ब) शाळेचे नाव व ठिकाण ____________________

क) उत्तीर्ण वर्ष व प्रमाणपत्र ____________________

ड) आसन क्रमांक ____________________

इ) मिळालेले गूण / किती पैकी किती ____________________

**१२) एच.एस.सी. (१२ वी) ची तत्सम परीक्षा उत्तीर्ण** ____________________

अ) परीक्षा मंडळाचे नाव ____________________

ब) शाळेचे नाव व ठिकाण ____________________

क) उत्तीर्ण वर्ष व प्रमाणपत्र ____________________

ड) आसन क्रमांक ____________________

इ) मिळालेले गूण / किती पैकी किती ____________________

**१३) १२ वी पेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता (ए.एन.ए) उत्तीर्ण** ____________________

अ) परीक्षा मंडळाचे नाव ____________________

ब) शाळेचे नाव व ठिकाण ____________________

क) उत्तीर्ण वर्ष व प्रमाणपत्र ____________________

ड) आसन क्रमांक ____________________

इ) मिळालेले गूण / किती पैकी किती ____________________

| **१४) अवगत असलेल्या भाषा :-** | **मराठी** | **इंग्रजी** | **हिंदी** |
| --- | --- | --- | --- |
| अ) वाचणे | | | |
| ब) लिहिणे | | | |
| क) बोलणे | | | |

उमेदवाराची सही: ____________________

नाव :- ____________________

# “प्रतिज्ञापत्र”

मी खालील अर्जदार असे जाहीर करते/करतो की, सदर अभ्यासक्रमाची प्रचलित नियमावली मी पूर्णपणे वाचली असून ती मला मान्य आहे. अर्जातील माहिती मी स्वहस्ताक्षरात भरली असून ती संपूर्णपणे सत्य आहे. त्यात काही असत्य माहिती दिल्याचे केंव्हाही आढळून आल्यास माझा अर्ज अथवा मला दिलेला प्रवेश रद्द होऊ शकतो याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच माझ्याकडून शिक्षणक्रमाच्या कालावधीत नियमबाहय व आक्षपार्ह वर्तन घडल्यास मला केंव्हाही प्रशिक्षण वर्गातून कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संस्थाप्रमुखांकडून काढून टाकले जाईल याचीही मला पूर्ण जाणीव आहे. असे गैरवर्तन माझेकडून होणार नाही याची मी हमी देते / देतो.

शासनाचे प्रचलित नियम, विधी व कायदे त्याचप्रमाणे वेळोवेळी करण्यात येणारे नियम, विधी व कायदे मला मान्य असून, मी परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाबाहेर शासकीय नियम वा शिस्तीला बाधा येईल, असे वर्तन करणार नाही. याची मी हमी देते / देतो.

ठिकाण :- ______________________

दिनांक :- ______________________ अर्जदाराची सही ______________________

---

यासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रे इ.साक्षांकित सत्यप्रतींची यादी...

| जोडले आहे / नाही | जोडले आहे / नाही |
|---|---|
| १) शाळा सोडल्याचा दाखला | ६) जात / जात वैधता प्रमाणपत्र |
| २) १० वी १२ वी (१०+२) परीक्षांच्या गुणपत्रिका व १० वी उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र (बोर्ड सर्टिफिकेट) | ७) वैद्यकीय सक्षमता प्रमाणपत्र ( Medical Fitness Certificate) |
| ३) अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो | ८) आधारकार्ड छायाप्रत. |
| ४) अर्हताकारी परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण करण्यात आली, याबाबत शाळा/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र | ९) ________________ |
| ५) अधिवास (डोमेसाईल) व नागरीकत्व (नॅशनॅलिटी) | १०) ________________ |

# MEDICAL FITNESS

A candidate must be medically fit for selection for the G.N.M. programme. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed proforma, as given below on a Letterhead :

## CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination of Shri/Smt./Kumari............................................................ Who is desirous of selection to the General Nursing And Midwifery programme (3 years) in Government Medical Colleges & Hospital's on the establishment of Directorate of Medical Education & Research, Mumbai.

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit / unfit.

Certified that he/she fulfills the following criteria.

| | | |
|---|---|---|
| 1. | Absence of any incapacitating and /or progressive systemic disease/disorder/condition | Yes/No |
| 2. | Absence of any disability of upper limb/s. | Yes/No |
| 3. | Absence of any major visual/ auditory disability. | Yes/No |
| 4. | Absence of psychosis/neurosis/mental retardation, | Yes/No |
| 5. | Ability to maintain erect posture, | Yes/No |
| 6. | Reasonable manual dexterity. | Yes/No |

Though, following deviations have been revealed, in my opinion, these are not impediments to do admitted as a G.N.M. programme.

1..........................................................................................................

2..........................................................................................................

| | |
|---|---|
| Seal of Registered Medical Practitioner and Address of the Registered Medical Practitioner | Signature with Date |
| | Name: |
| | Registration No.: |
| | |
| | |